N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सातारा  **P.S.(ठाणे):** तळबीड
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0023  **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनाक आणि वेळ):**03/02/2026 01:30

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिंनाक पासून):** 02/02/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 02/02/2026
**Time From (वेळेपासून):** 14:40 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:41 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 03/02/2026  **Time (वेळ):** 01:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 03/02/2026 01:30 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** वनविभाग ऑफिस , वराडे ,कराड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सुनिल दाजी पाटील पोलीस निरीक्षक

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रुद्रांश हाइट्स, रुम नंबर 13, ,गोळीबार मैदान गोडोली,सातारा,सातारा, सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | वर्तमान पता | थावडे पो सोंडोली,शाहुवाडी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 3 | स्थायी पता | थावडे पो सोंडोली,शाहुवाडी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8308469377

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संतोष अनंतराव जाधवर | | | 1. प्लट नंबर 130 ए, गजानन , हौसोसायटी, ओगलेवाडी, तळबीड ,सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

खबरी जबाब दिंनाक 03/02/2026

मी सुनिल दाजी पाटील वय 38 वर्षे, व्यवसाय - पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, सातारा रा. रुद्रांश हाईट्स, रुम नंबर 13, गोळीबार मैदान गोडोली, सातारा ता.जि.सातारा मुळ रा. मु. थावडे पो. सोंडोली, ता. शाहुवाडी जि.कोल्हापुर मोनं - 8308469377

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग सातारा येथे पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे. दि. 02/02/2026 रोजी श्री. राजेश वाघमारे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. सातारा यांनी आम्हास फोन वरुन कळविले की, तक्रारदार अन्सार शब्बीर पटवेगार रा. शनिवारपेठ कराड यांनी लाकुड वाहतुक परवाना देणेसाठी वनविभाग ऑफिस वराडे ता.कराड येथील वनपाल संतोष जाधवर हे 7600/- रुपये लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रार फोनव्दारे कळविली असून सदर तक्रारदार संपर्क करतील त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करा असे आम्हास आदेशित केले.

दिंनाक 02/02/2026 रोजी सकाळी 09.04 वा. तक्रारदार अन्सार पटवेकर यांनी त्यांचे मोबाईल फोन वरुन आम्हाला संपर्क केला. तेव्हा तक्रारदार यांनी लाकुड वाहतुक परवाना देणेसाठी वनविभाग ऑफिस वराडे ता.कराड येथील वनपाल संतोष जाधवर हे 7600/- रुपये लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रार सांगीतली व तक्रारीवर कराड येथे येवुन कारवाई करणेबाबत विंनती केली. तेव्हा आम्ही तक्रारदार यांना जल शुद्धीकरण केंद्र कराड येथे 10.30 वा. हजर राहण्यास सांगीतले. त्यानुसार जिल्हा रुग्णालय सातारा (सिव्हील हॉस्पीटल) येथील दोन शासकीय पंचांना पंच म्हणुन काम करणेसाठी उपस्थित राहणेबाबत सुचना दिल्या त्यानुसार पंच म्हणुन 1. सुहास श्रीरंग डाफळे, अधिपरिचारक, जिल्हा साधारण रुग्णालय सातारा 2. आकाश कृष्णा देसाई, अधिपरिचारक, जिल्हा रुग्णालय सातारा हे उपस्थित राहीले. दोन्ही पंचांना सापळा पथकाची ओळख करुन दिली तसेच तक्रारदार श्री. अन्सार पटवेकर हे जलशुद्धीकरण केंद्र कराड येथे थांबलेले असुन तेथे जावुन सापळा कारवाई करणार असल्याचे दोन्ही पंचांना सांगितले. त्यानुसार सापळा पथकामध्ये पोहवा ताटे, राजपुरे, पोशि थोरात, पोशि शिंदे यांना समाविष्ठ करण्यात आले. शासकीय वाहन क्रमं◌ाक एम एच 11 डी एच 8213 या वाहनामधुन पडताळणी व सापळा कारवाईकामी लागणारे साहित्य घेऊन लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, सातारा येथुन बाहेर पडुन उंब्रज मार्गे कराड येथे पाहोचलो. त्यावेळी शासकीय वाहन पोहवा ताटे हे चालवित होते.

आम्ही, सापळा पथक व दोन शासकीय पंचासह जलशुद्धीकरण केंद्र कराड येथे 10.15 वा. पोहचलो त्यावेळी एक इसम हिरो ॲक्सेस मोटारसायकल क्रमांक एम एच 50 पी 6398 वर हजर होता. तेव्हा त्यांना नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अन्सार शब्बीर पटवेगार, वय 39 वर्षे, व्यवसाय - लाकुड व्यवसाय, रा. 601, शनिवारपेठ कराड ता.कराड जि.सातारा असल्याचे सांगीतले व ते तक्रारदार असल्याचे सांगीतले. सदर वेळी तक्रारदार अन्सार पटवेगार व नमुद दोन्ही पंच यांची एकमेकांची ओळख करुन दिली तसेच सापळा पथकातील अधिकारी अंमलदार यांची ओळख करुन दिली. त्यानंतर आम्ही पंच साक्षीदार यांना तक्रारदार श्री. अन्सार पटवेगार यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून त्यांची तक्रार नोंदवून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणे आहे त्याकामी आपण पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता त्यास नमुद दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला. त्याप्रमाणे पंच क्र.1 म्हणून श्री. सुहास श्रीरंग डाफळे पंच क्र.2 म्हणून श्री. आकाश कृष्णा देसाई हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार यांनी त्यांची तक्रार प्रथम तोंडी कथन केली व नंतर लेखी स्वरुपात दिली ती पुढीलप्रमाणे. मी शनिवारपेठ कराड येथील कायमचा रहिवाशी असुन पटवेगार फर्निचर ॲंड टिंबर मर्चंट या नावाने माझा लाकुड खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे. त्याचबरोबर मी शेतकऱ्यांची वनविभागाची झाडे तोडण्याची परवानगी असलेली झाडे खरेदी करून तोडून वाहतूक करण्याचा व्यवसाय करतो. माझे टिंबर (लाकुड) व्यवसायाचे लायसन्स आहे. त्याचा लायसन्स क्रमं◌ाक



Scanned with CamScanner

2331400318324361 हा आहे. माझे शिक्षण 9 वी पर्यंत झाले असुन मला मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान आहे. मी हणमंत काटकर यांचेकडून त्यांचे मालकीची मौजे साकुर्डी ता.कराड जि.सातारा येथील जमीन गट नंबर 133 मधील 100 सागाची झाडांची खरेदी केली त्यासाठी लागणारी वनविभागाची झाडे तोडण्याची परवानगी व लाकूड वाहतुकीची परवानगी चे काम मुळ मालक हणमंत काटकर यांचे वतीने मी करणार असून तसा आमचे मध्ये लेखी करार केला आहे. त्याप्रमाणे मुळ मालक हणमंत काटकर यांचे नावे दिंनाक 05/12/2025 रोजी वनक्षेत्रपाल, कराड यांना झाडे तोडण्याची परवानगी मिळणेबाबत अर्ज केला होता त्यावर दिंनाक 23/01/2026 रोजी वनक्षेत्रपाल (प्रा.) विभाग, कराड यांचेकडील जा.क्र.ब/मा.वृ.तो/2025-26/63 अन्वये हणमंत काटकर यांचे नावे झाडे तोडण्याची वनविभागाची परवानगी मिळाली होती. त्यानुसार मी दिंनाक 23/01/2026 ते दिंनाक 27/01/2026 या कालावधीमध्ये सदरची झाडांची तोड केलेली आहे. सदरची झाडे तोडल्यानंतर त्याचा वाहतूक परवाना घेण्यासाठी मी वनविभागाचे संतोष जाधवर यांची भेट घेतली असता त्यांनी वाहतूक परवाना देण्यापूर्वी तोडलेल्या झाडांचा पंचनामा करून मोजमापे घ्यावी लागतील असे सांगून त्यांनी पंचनामा न करता मलाच तोडलेल्या झाडांची मापे घेण्यास सांगितली. त्यांनी सांगितलेवरून मी तोडलेल्या झाडांची मोजमापे घेतली.
त्यानंतर तोडलेल्या सागाच्या झाडांची मोजमापांची यादी तयार करून मी दिंनाक 31/01/2026 रोजी वनविभाग ऑफिस, वराडे ता.कराड येथे वनपाल संतोष जाधवर यांची भेट घेतली. त्यावेळी वनपाल संतोष जाधवर यांनी तोडलेल्या झाडांची मोजमापे हे अंदाजे एकूण 19 घनमीटर झाले असून प्रत्येकी घनमीटर 400 रु प्रमाणे 7,600 /रु द्यावे लागतील असे सांगितले. तसेच झाडे तोडल्यानंतर लाकूड वाहतूकीच्या परवानासाठी त्यावेळी वेगळे पैसे दयावे लागतील असे म्हणून माझ्याकडे मोजमाप करून पंचनामा करण्यासाठी 7,600/- रु ची लाचेची मागणी केली. त्यावेळी वनपाल संतोष जाधवर हे माझ्याकडे मागणी करत असलेले 7,600/- रुपये ही लाच असल्याची माझी खात्री झाली. परंतु मी वनपाल जाधवर यांना पैसे दिले नाहीत तर ते मला तोडलेल्या झाडांचा वाहतुक परवाना देणार नाहीत त्यामुळे मी त्यांना नाईलाजाने पैसे देण्यास होकार देवुन आलो आहे. परंतु त्यांना लाच रक्कम देण्याची माझी अजिबात इच्छा नाही.
तरी आज दिंनाक 02/02/2026 रोजी मी वनपाल जाधवर यांनी सांगितलेप्रमाणे शाहू चौक, कराड जि.सातारा येथे जावुन त्यांची भेट घेवून त्यांनी मागणी केलेल्या लाच रकमेबाबत चर्चा करणार आहे. चर्चेदरम्यान त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास आपले विभागाकडुन त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यास विंनती आहे. माझेत व वनपाल संतोष जाधवर यांचेत कोणताही आर्थिक व्यवहार नसुन पुर्ववैमनस्य नाही. वगैरे मजकुराचा सहीचा तक्रारी अर्ज हजर केला. त्यावर आम्ही व पंचानी सह्या केल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. अन्सार पटवेगार यांचेकडे वनपाल संतोष जाधवर हे लाच मागणी करतात अगर कसे? याबाबतची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविले. त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये एमएम कार्डस कंपनीचे नवीन सिंलबद मेमरीकार्ड वेस्टनातुन बाहेर काढले ते व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले. तक्रारदार व पंच यांना व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती दिली तसेच त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे उपस्थित सर्वांची खात्री करून दिली. त्यानंतर आम्ही उपस्थित पंच साक्षीदार, तक्रारदार व सापळा पथकास पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर 11.51 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार पटवेकार व पंच पंच क्र.1 सुहास डाफळे पंच क्र. 02 आकाश देसाई यांचे पडताळणी कारवाईचे निवेदन घेतले. तक्रारदार व पंचांचे निवेदन घेवुन शाहु चौक, कराड येथे जाणेसाठी तक्रारदार यांना पंच नंबर 1 यांचेसोबत तक्रारदार यांचेकडील दुचाकीवरुन रवाना केले.

त्यानंतर आम्ही सापळा पथक पंच क्र.02 असे जलशुद्धीकरण केंद्र कराड येथे थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 12.46 वा.ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 डाफळे यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे शाहु चौक, कराड येथे गेलो तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल फोन नंबर 7798677765 वरुन लाउड स्पीकर ऑन करुन वनपाल,संतोष जाधवर यांचे मोबाईल फोन नंबर 9850520664 वर फोन करुन "कुठ आहे साहेब" असे विचारले तेव्हा वनपाल जाधवर यांनी "आता मी निघालोय, तु कुठ हाय आता" असे तक्रारदार यांना विचारले त्यावर तक्रारदार "मी आता बरोबर ह्याच्यापाशी हाय, आपल सिग्रल पाशी आहे" असे म्हणाले तेव्हा जाधवर यांनी "कुठल्या" असे विचारले तेव्हा तक्रारदार "शाहु चौकच्या अलीकडच्या सिग्रल न्हाय व्हय त्यो" असे म्हणाले तेव्हा जाधवर "हां.. मग शाहु चौकच्या इथे येतो का" असे म्हणाले त्यावर तक्रारदार "हा येतो की" असे म्हणाले. त्यानंतर थोडा वेळ वाट पाहुन तक्रारदार यांनी पुन्हा फोन केला असता जाधवर "हां अन्सार"असे म्हणाले तेव्हा तक्रारदार "हां साहेब, थांबलोय शाहु चौकात हाय" असे म्हणाले. त्यानंतर थोड्या वेळाने एका दुचाकीवर खाकी गणवेश परिधान केलेली व्यक्ती आली व तक्रारदार



Scanned with CamScanner

यांचेशी बोलु लागली तेव्हा तक्रारदार त्यांना "मग नमस्कार जाधवर साहेब काय" असे म्हणाले तेव्हा मला ते वनपाल जाधवर असल्याचे समजले. तेव्हा वनपाल जाधवर तक्रारदार यांना "काय म्हणताय अन्सारजी, तंबाखु पुडी आणली का नाय" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "आज आणली, आज आणली" असे म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर हे "सगळ मिळून करायच झग झग करत बसायच नाय" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "आव पण" असे म्हणाले तेव्हा वनपाल जाधवर हे "मी पण लय आभाळ फाटल्यागत बोलत न्हाय ना, आपले जुने संबंध हायत इसरून विसरलाय आणि जे चालय तेच बोललो. मी चौकशी करून इतराकडून हजार रुपये घेतो. हे तर भोगवटा वर्ग 2 हाय चव्हाणच्या नावावर होत का नाय" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "अव जाधवर साहेब, लय पैस होत्यात व्हय व चारशे रूपये" असे म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर "केल की नाय लय होत" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "आता बघा की किती हयुत्याती" असे म्हणाले. त्यावर वनपाल जाधवर "वर कमी कर काय करायचं ते, मला मारीत जावू नको लका" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "आव असं कसं म्हणताय तुम्ही" असे म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर "अ मला मारीत जावू नकोस" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी "किती पैसे झालं आपलं" असे विचारले. तेव्हा वनपाल जाधवर यांनी "करानां चारशे रूपयेने माझा हिशोब केलाय मी" असे तक्रारदार यांना सांगीतले. तेव्हा तक्रारदार यांनी "किती होत्यात त्याच" असे विचारले. तेव्हा जाधवर हे "तु मॅडमला किती दयायचं ती दि चारशे दि नायतर तिनशे दि मला करायचय मी लोकांची जबाबदारी नाय घेणार इथ बिना कारण भुर्दुंड हुतो तिकड" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार त्यांना "ती माझ मी बघतो तिकड काय नाय" असे म्हणाले. तेव्हा लोकसेवक जाधवर व तक्रारदार यांनी कामाबाबत चर्चा केली तेव्हा तक्रारदार यांनी "किती हुत्याती ती पैसे म्हटला" असे विचारले असता वनपाल जाधवर यांनी "माझ का?"असे विचारले तेव्हा तक्रारदार हा म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर यांनी त्यांचा मोबाईल फोन बाहेर काढुन मोबाईल मधील कॅल्क्युलेटर वर सात हजार सहाशे रुपये असा आकडा टाईप करुन दाखविला. तेव्हा तक्रारदार त्यांना "सात हजार सहाशे रुपये लय हुत्याती साहेब, मी हेज साडे तिनशे रूपयेन करणार, करा माझ्यासाठी करा." असे म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर हे "काय विनाकारण आ" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "लय पैसे ह्युतात साहेब" असे म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर हे "भोगवटा वर्ग दोन हाय ओ, भोगवटा वर्ग दोन हायती कस हुईल चार पाच   जणाच्या खात्यावर जमीन हाय, एकाच्याच हाय व्हय. ते फक्त मी घेतो म्हणून झाली. दुसर कुणी सागर कुंभार असताना ती करतच नव्हतं. असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "बरं ती बाकीच प्रकरण कसं कसं करायच म्हणला तुम्ही" असे म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर यांनी "तुझ्याकड देतो मी" असे म्हणुन तक्रारदार यांना पंचांची सही नसलेला पंचनामा, मोजमाप यादी, मालकीदाराचा जबाब असलेली कागदपत्रे तक्रारदार यांचेकडे दिली. तेव्हा तक्रारदार "ती माझ्याकड दया, पंचाच्या सह्या कुंठ द्यायच्या काय काय" असे म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर हे "पंचाच नाव टाकू नको नाव चिठ्ठीवर लिहून घी, चिठ्ठी दयायची का ह्याला जोडून" असे म्हणाले. त्यानंतर वनपाल जाधवर व तक्रारदार यांचेत वनपाल जाधवर यांनी दिलेल्या कागदपत्रांबाबत चर्चा झाली तेव्हा लोकसेवक जाधवर हे तक्रारदार यांना "नाय चालणार, ऑबजक्शन नको, राजु भाईला फोन नको करायला, परत डॉकी वर्क कशाला पाहिजे, तुम्ही काय लॅपटॉपवर टाकलया ना, पासाच माहिति हाय ना, ती परत झगझग करत बसशील" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी "त्याच किती आता" असे विचारले तेव्हा वनपाल जाधवर यांनी "पासाचे दोन हजार रुपये" असे तक्रारदार यांना सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांचेत व वनपाल जाधवर यांचेत पुन्हा कामाबाबत चर्चा झाली. त्यानंतर तक्रारदार यांनी "बरं तुम्ही कुठ जाणार हाय आता" असे विचारले त्यावर संतोष जाधवर हे "साता-याला" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार कामाबाबत चर्चा करुन "पंधरा मिनीटात लगीच आलु" असे म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर हे "लगीच परत येणार हाय शिक्का घेवुन आता मॅडमला फोन करणार हाय" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "पंधरा, मी इथ ऑफीसला जाणार न्हाय तुम्ही ह्याचा ऑफीसला आपल्या कुठल" असे म्हणाले. तेव्हा लोकसेवक जाधवर "वराडे" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना "मग येणारच हाय की मी तिकड" असे सांगीतले. तेव्हा वनपाल जाधवर हे "येणार हाय का" असे म्हणाले व तक्रारदार यांना "मला फोन कर मग" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे कामाबाबत चर्चा केली तेव्हा तक्रारदार वनपाल जाधवर यांना "तुम्हाला सात हजार द्यायच, माझ्यासाठी सात हजार साहेब घ्या" असे म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर यांनी मान हलवुन होकार देवुन ""हु लगा लोकांना दारु पाजताय हुं म्हणुस्तर" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व वनपाल जाधवर यांचेत जाधवर यांनी दिलेल्या कागदपत्रांबाबत चर्चा झाली. त्यानंतर मी व तक्रारदार असे तक्रारदार यांच्या दुचाकी वाहनावरुन पुन्हा जलशुद्धीकरण केंद्र कराड येथे परत आलो. त्यानंतर तक्रारदार यांना हकीकत विचारली असता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकुन ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

एकंदरीत यातील तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे दिनाक 02/02/2026 रोजी केले पडताळणी कारवाईमध्ये संतोष जाधवर, वनपाल यांनी तक्रारदार अन्सार पटवेगार यांनी हनमंत काटकर यांचेकडुन विकत घेवुन



Scanned with CamScanner

तोडणी केलेल्या सागवान लाकडाचे मोजमाप घेवुन वाहतुकीचा परवाना देण्यासाठी लागणारा पंचनामा करण्यासाठी प्रतिघनमिटर 400/- रुपये प्रमाणे अंदाजे 19 घनमिटरचे एकुण 7600/- रुपये व तोडणी केलेल्या लाकडांचा वाहतुक पास देण्यासाठी 2000/- रुपये अशी एकुण 9600/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती तक्रारदार यांचेकडे 7000/- रुपये लाचेची मागणी पंच नंबर 1 यांचे समक्ष केली आहे. तसेच तक्रारदार यांना लाच रक्कम घेवुन वन विभाग कार्यालय वराडे ता.कराड जि.सातारा येथे बोलाविले असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार अन्सार पटवेगार यांना सापळापुर्व पंचनामा कारवाई सुरू करण्यात येत असल्याबाबत सांगितले. त्यानंतर आमचे सुचनेनुसार तक्रारदार पटवेगार यांना दोन्ही पंचांसमक्ष लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी लाच रक्कम 7,000/- रुपये हजर केले. त्यानंतर पोशि थोरात यांनी नमुद नोटांचे नंबर कागदावर लिहुन काढले.
त्यानंतर तात्काळ सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरवले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना पडताळणी व सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची अंगझडती व लाचेची रक्कम जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण पोहवा ताटे हे त्यांचे मोबाईल फोन मध्ये करणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर त्यांचे मोबाईल फोनमध्ये नवीन सिंलबद मेमरी कार्ड टाकण्यात आले.

त्यानंतर आम्ही शासकिय वाहनामध्ये◌ काळया पडदयाच्या सहाय्याने कृत्रीम अंधारात दोन्ही पंचांना व तक्रारदार शिंदे यांना अंन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून त्याचे प्रात्यक्षिक पोहवा राजपुरे यांनी करून दाखवले. त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेली लाच रक्कम पोहवा राजपुरे यांना ॲन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिली. तेव्हा पोहवा राजपुरे यांनी कापसाच्या बोळयाने प्रत्येक चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस ॲन्थ्रासीन पावडर लावली व त्यानंतर पोहवा राजपुरे यांनी सदर लाचेची रक्कम रुपये 7000/- तक्रारदार पटवेगार यांचे पॅन्टचे उजव्य खिशात ठेवली. त्यानंतर पोहवा राजपुरे यांना सापळा पथकातुन वगळण्यात आले. त्यानंतर आम्ही पंचांना तक्रारदार व पोलीस पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या प्रमाणे सूचना दिल्या. तसेच तक्रारदार यांना लाच रक्कम स्विकारलेनंतर डावा हात डोक्यावरुन दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर 14.05 वा. डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये प्रथम तक्रारदार अन्सार पटवेगार त्यानंतर पंच क्र.01 श्री. सुहास डाफळे व पंच क्र.02 आकाश देसाई यांचे सापळा निवेदन ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर तक्रारदार लोकसेवक जाधवर कोठे आहेत याची खात्री करण्यासाठी तक्रारदार यांनी त्यांचा मोबाईल फोन नंबर 7798677765 वरुन लोकसेवक संतोष जाधवर यांचे मोबाईल फोन नंबर 9850520664 वर फोन करुन "ह.... कुठंय तुम्ही" असे विचारले असता संतोष जाधवर यांनी "हा ऑफीस मधी हाय" असे सांगीतले तेव्हा तक्रारदार यांनी "कुठ?वराडयात हाय. " असे विचारले असता जाधवर यांनी हो म्हणुन सांगीतले. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांनी परीधान केलेल्या शर्टच्या आतील बनियानला लाऊन देऊन संतोष जाधवर, वनपाल यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार व पंच नंबर 1 यांना तक्रारदार यांचे दुचाकी वाहनावरुन रवाना केले. त्यांचेपाठोपाठ आम्ही, पंच नंबर 2, सापळा पथक असे जलशुद्धीकरण केंद्र कराड येथुन शासकिय वाहनातुन रवाना झालो. तक्रारदार हे त्यांचेकडील दुचाकी वाहनाने पंच नंबर 1 यांना घेवुन जलशुद्धीकरण केंद्र कराड येथुन निघुन हायवेने तळबीड मार्गे वनविभाग ऑफिस वराडे ता. कराड जि.सातारा येथे गेले. तक्रारदार हे गेट मधुन आत गेलेनंतर शासकीय वाहन गेटचे बाहेरच लावुन सापळा पथक वनविभाग ऑफिस वराडे येथे कार्यालयाचे आसपास कोणासही संशय येणार नाही अशा रितीने परिसरात थांबून राहीले.
तक्रारदार व पंच क्र. 01 हे वनविभाग ऑफिस वराडे येथे एका कार्यालयात गेले. थोडया वेळाने तक्रारदार यांनी कार्यालयातुन बाहेर येवुन लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजित इशारा केला असता आम्ही सदर कार्यालयासमोर जावुन तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 14.41 वा ची होती. तेव्हा आडोशास थांबुन राहीलेल्या सापळा पथकातील पोशि शिंदे व पोशि थोरात यांनी संतोष जाधवर, वनपाल यांचा अनुक्रमे डावा व उजवा हात पकडला ती वेळ 14.42 वा ची होती. त्यावेळी यापुर्वी दिल्या सुचना दिलेप्रमाणे पोहवा ताटे यांनी व्हिडीओ चित्रीकरण सुरु केले. तेव्हा आम्ही संतोष जाधवर यांना स्वत:ची ओळख सांगुन त्यांचे नाव व पदाबाबत माहीती विचारली असता त्यांनी त्यांचे नाव संतोष अनंतराव जाधवर, वय 44 वर्षे, व्यवसाय नोकरी वनपाल, वनपरिक्षेत्र कार्यालय कराड, राऊंड ऑफिस वराडे ता.कराड जि.सातारा वर्ग 3, रा. प्लॉट नंबर 130 ए, गजानन हौ. सोसायटी, ओगलेवाडी कराड ता.कराड जि.सातारा मुळ रा. रत्नापुर ता.कळंब जि.धाराशिव असे असल्याचे सांगीतले.

त्यांनतर तक्रारदार यांना संतोष जाधवर यांनी लाच रक्कम कुठे ठेवली याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले की, मी संतोष जाधवर यांना "बर थांबा थांबा, बर जावू का मी, सात हजार हायत" असे म्हणुन माझे



Scanned with CamScanner

पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवलेली लाच रक्कम उजव्या हाताने काढुन संतोष जाधवर यांचे पुढे धरली असता त्यांनी डाव्या हाताने लाच रकमेचा स्विकार करुन लाच रक्कम दोन्ही हाताने मोजुन घेवुन त्यांचे पॅन्टचे डावे बाजुच्या खिशात ठेवली असल्याचे सांगीतले. त्यानंतर आमचे सुचनेनुसार पंच क्र.02 श्री. देसाई यांनी संतोष जाधवर यांचे खिशातील लाच रक्कम काढुन त्यांचे ताब्यात घेतली. त्यावेळी लाच रकमेच्या नोटांचे नंबर आणि पंच क्र. 02 यांचे जवळील सापळा पुर्व कारवाई दरम्यानचे नोटांचे नंबर लिहुन दिलेल्या कागदावरील नंबर हे एकच आहेत का याबाबत खात्री करण्यास सांगितले. त्याप्रमाणे पंच क्र.02 श्री. देसाई यांनी नोटांचे नंबर त्यांचेकडील कागदावर लिहीलेल्या नंबरशी पडताळुन पाहीले असता ते तंतोतंत जुळुन आले. त्यानंतर वनविभाग ऑफिस वराडे येथे लाईट बंद करुन कृत्रीम अंधारामध्ये संतोष जाधवर यांचेकडुन हस्तगत केलेली लाच रक्कम व त्यांचे दोन्ही हात अल्ट्रा व्हायलेट दिव्याच्या प्रकाशामध्ये दोन्ही पंचासमक्ष तपासणी केली असता संतोष जाधवर यांचे दोन्ही हातास पुढील बाजुस ,बोटं◌ाच्या पेऱ्यावर निळसर चकाकी दिसुन आली. तसेच हस्तगत केलेल्या 7000/- रुपये लाच रकमेस अन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. तसेच पंच क्र.02 यांचे हातासही ॲन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर तक्रारदार यांचे हाताची तपासणी केली असता त्याचे उजवे हातास ॲन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर लोकसेवक संतोष जाधवर यांना तक्रारदार यांचे कामाबाबतचे कागदपत्रांबाबत विचारणा केली असता मुळ अर्जदार काटकर यांचा अर्ज व मोजमाप नोंदी असलेली कागदपत्रे त्यानुसार तक्रारदार यांचे कामाची कागदपत्रे वनविभाग ऑफिस वराडे ता.कराड येथुन पंचासमक्ष ताब्यात घेतली. त्यावेळी पोहवा ताटे यांनी त्यांचेकडील मोबाईल फोनमध्ये कागदपत्रे जप्तीच्या कारवाईचे छायाचित्रण केले आहे.

त्यानंतर सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई शासकीय विश्रामगृह कराड येथे जावून करण्याचे सर्वानुमते निश्चित केले. शासकीय विश्रामगृह कराड येथे आम्ही पंच नंबर 1 यांना घडलेल्या हकीकतीविषयी विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, मी व तक्रारदार तक्रारदार यांचे दुचाकी वाहनावरुन वनविभाग ऑफिस वराडे येथे गेलो तेव्हा तेथे संतोष जाधवर हे कार्यालयाचे बाहेर उभे होते. तेव्हा तक्रारदार यांना पाहुन संतोष जाधवर यांनी "त्यांच्या पाठीवर थाप पण गाडी आमच्या अंगावर, लग्नाला चालला का?" असे विचारले तेव्हा तक्रारदार "नाय उंब्रज मधी पण हायती तीन चार झाड येतो की बघून" असे म्हणाले. तेव्हा जाधवर यांनी "किती झाड हायती" असे विचारले त्यावर तक्रारदार यांनी "कुठली" असे विचारले. तेव्हा वनपाल जाधवर यांनी "उंब्रज मधी" असे विचारले◌े त्यावर तक्रारदार यांनी "उंब्रजी मधी सात हायत" असे सांगीतले. त्यावर वनपाल जाधवर हे "सात फक्त" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "मग बघतो की जावून आता बघीतल्या शिवाय, बघून म्हटलं ठरवू." असे म्हणाले. त्यावर वनपाल जाधवर यांनी तक्रारदार यांना "झाल्याका सह्या" असे विचारले त्यावर तक्रारदार "सह्या कुठल्या, तिकडण आलूय इकड डायरेक्ट, जेवला की नाय?" असे म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर "बिगर परवाना कुठ तोडल्याली नायत ना लाकड" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "नाय कुठ काय, एक लाकूड तोडल नाय कुठल विना परवानगीच, या की" असे म्हणाले. तेव्हा जाधवर हे "नको नको" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी "बर थांबा थांबा, बर जावू का मी, सात हजार हायत" असे म्हणुन त्यांचे पॅन्टचे उजव्या बाजुच्या खिशात ठेवलेली 7000/- रुपये लाच रक्कम काढुन जाधवर यांचेसमोर धरली असता जाधवर यांनी डाव्या हाताने लाच रकमेचा स्विकार करुन लाच रक्कम दोन्ही हातांनी मोजुन लाच रक्कम त्यांचे पॅन्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली व जाधवर हे तक्रारदार यांना "बस" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "बास की आता साहेब, काय साहेब" असे म्हणाले. तेव्हा जाधवर "ठिक हाय, ..... ही लय महत्वाच हाय बाबा" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "चालतय येवु का" असे म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर "ओके.... ते प्रकरण कुठंय फोटो काढून घेतो" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "कसल" असे म्हणाले त्यावर वनपाल जाधवर हे "प्रकरणाच" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार त्यांना "व्हाटसअप करतो की" असे म्हणाले. त्यावर वनपाल जाधवर यांनी "कुठय प्रकरण" असे तक्रारदार यांना विचारले तेव्हा तक्रारदार यांनी प्रकरण "घरात हाय" असे सांगीतले. त्यावर तक्रारदार हो म्हणाले. त्यानंतर मी व तक्रारदार ऑफिसचे बाहेर आलो. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचे डोक्याचे केसावरुन डावा हात दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने संतोष जाधवर यांना ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना हकीकत विचारता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली.

तरी दिंनाक 02/02/2026 रोजी तक्रारदार अन्सार शब्बीर पटवेगार, वय 39 वर्षे, व्यवसाय - लाकुड व्यवसाय, रा. 601, शनिवारपेठ कराड ता.कराड जि.सातारा यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिंनाक 02/02/2026 रोजी शाहु चौक कराड येथे पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक संतोष अनंतराव जाधवर, वय 44 वर्षे, व्यवसाय नोकरी वनपाल, वनपरिक्षेत्र कार्यालय कराड, राऊंड ऑफिस वराडे ता.कराड जि.सातारा वर्ग 3, रा. प्लॉट नंबर 130 ए, गजानन हौ.सोसायटी, ओगलेवाडी कराड ता.कराड जि.सातारा मुळ रा. रत्नापुर ता. कळंब जि.धाराशिव शाहु चौक, कराड ता.कराड जि.सातारा यांनी तक्रारदार अन्सार पटवेगार यांनी हनमंत काटकर



Scanned with CamScanner

यांचेकडुन विकत घेवुन तोडणी केलेल्या सागवान लाकडाचे मोजमाप घेवुन वाहतुकीचा परवाना देण्यासाठी लागणारा पंचनामा करण्यासाठी प्रतिघनमिटर 400/- रुपये प्रमाणे अंदाजे 19 घनमिटरचे एकुण 7600/- रुपये व तोडणी केलेल्या लाकडांचा वाहतुक पास देण्यासाठी 2000/- रुपये अशी एकुण 9600/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती तक्रारदार यांचेकडे 7000/- रुपये लाचेची मागणी पंच नंबर 1 यांचे समक्ष केली आहे. तसेच 7000/- रुपये लाच रक्कम सापळा कारवाईवेळी वनविभाग ऑफिस वराडे ता.कराड जि.सातारा येथे तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष स्विकारली आहे. म्हणुन त्यांनी बेकायदेशीररित्या अप्रामाणिकपणे आर्थिक फायदा मिळविलेला आहे म्हणुन माझी त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशिर फिंयाद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

kiran ravindra bhosale(I (Inspector)) / 100 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**



Scanned with CamScanner

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस स्टेशन ऑफीसर
तळबीड पोलीस ठाणे
ता कराड, जि. सातारा

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** kiran ravindra bhosa
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 100



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें.मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with CamScanner

**खबरी जबाब दिनांक 03/02/2026**

मी सुनिल दाजी पाटील वय 38 वर्षे, व्यवसाय - पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा रा. स्द्रांश हाईट्स, रुम नंबर 13, गोळीबार मैदान गोडोली, सातारा ता.जि.सातारा मुळ रा. मु. थावडे पो. सोंडोली, ता. शाहुवाडी जि.कोल्हापुर मोनं - 8308469377

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा येथे पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे. दि. 02/02/2026 रोजी श्री. राजेश वाघमारे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. सातारा यांनी आम्हास फोन वरुन कळविले की, तक्रारदार अन्सार शब्बीर पटवेगार रा. शनिवारपेठ कराड यांनी लाकुड वाहतुक परवाना देणेसाठी वनविभाग ऑफिस वराडे ता.कराड येथील वनपाल संतोष जाधवर हे 7600/- रुपये लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रार फोनव्दारे कळविली असून सदर तक्रारदार संपर्क करतील त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करा असे आम्हास आदेशित केले.

दिनांक 02/02/2026 रोजी सकाळी 09.04 वा. तक्रारदार अन्सार पटवेकर यांनी त्यांचे मोबाईल फोन वरुन आम्हाला संपर्क केला. तेव्हा तक्रारदार यांनी लाकुड वाहतुक परवाना देणेसाठी वनविभाग ऑफिस वराडे ता.कराड येथील वनपाल संतोष जाधवर हे 7600/- रुपये लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रार सांगीतली व तक्रारीवर कराड येथे येवुन कारवाई करणेबाबत विनंती केली. तेव्हा आम्ही तक्रारदार यांना जल शुद्धीकरण केंद्र कराड येथे 10.30 वा. हजर राहण्यास सांगीतले. त्यानुसार जिल्हा रुग्णालय सातारा (सिव्हील हॉस्पीटल) येथील दोन शासकीय पंचांना पंच म्हणुन काम करणेसाठी उपस्थित राहणेबाबत सुचना दिल्या त्यानुसार पंच म्हणुन 1. सुहास श्रीरंग डाफळे, अधिपरिचारक, जिल्हा साधारण रुग्णालय सातारा 2. आकाश कृष्णा देसाई, अधिपरिचारक, जिल्हा रुग्णालय सातारा हे उपस्थित राहीले. दोन्ही पंचांना सापळा पथकाची ओळख करुन दिली तसेच तक्रारदार श्री. अन्सार पटवेकर हे जलशुद्धीकरण केंद्र कराड येथे थांबलेले असुन तेथे जावुन सापळा कारवाई करणार असल्याचे दोन्ही पंचांना सांगितले. त्यानुसार सापळा पथकामध्ये पोहवा ताटे, राजपुरे, पोशि थोरात, पोशि शिंदे यांना समाविष्ठ करण्यात आले. शासकीय वाहन क्रमांक एम एच 11 डी एच 8213 या वाहनामधुन पडताळणी व सापळा कारवाईकामी लागणारे साहित्य घेऊन लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, सातारा येथुन बाहेर पडुन उंब्रज मार्गे कराड येथे पाहोचलो. त्यावेळी शासकीय वाहन पोहवा ताटे हे चालवित होते.

आम्ही, सापळा पथक व दोन शासकीय पंचासह जलशुद्धीकरण केंद्र कराड येथे 10.15 वा. पोहचलो त्यावेळी एक इसम हिरो ॲक्सेस मोटारसायकल क्रमांक एम एच 50 पी 6398 वर हजर होता. तेव्हा त्यांना नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अन्सार शब्बीर पटवेगार, वय 39 वर्षे, व्यवसाय - लाकुड व्यवसाय, रा. 601, शनिवारपेठ कराड ता.कराड जि.सातारा असल्याचे सांगीतले व ते तक्रारदार असल्याचे सांगीतले. सदर वेळी तक्रारदार अन्सार पटवेगार व नमुद दोन्ही पंच यांची एकमेकांची ओळख करुन दिली तसेच सापळा पथकातील अधिकारी अंमलदार यांची ओळख करुन दिली. त्यानंतर आम्ही पंच साक्षीदार यांना तक्रारदार श्री. अन्सार पटवेगार यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून त्यांची तक्रार नोंदवून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणे आहे त्याकामी आपण पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता त्यास नमुद दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला. त्याप्रमाणे पंच क्र.1 म्हणून श्री. सुहास श्रीरंग डाफळे पंच क्र.2 म्हणून श्री. आकाश कृष्णा देसाई हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार यांनी त्यांची तक्रार प्रथम तोंडी कथन केली व नंतर लेखी स्वरुपात दिली ती पुढीलप्रमाणे. मी शनिवारपेठ कराड येथील कायमचा रहिवाशी असुन पटवेगार फर्निचर ॲंड टिंबर मर्चंट या नावाने माझा लाकुड खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे. त्याचबरोबर मी शेतकऱ्यांची वनविभागाची झाडे तोडण्याची परवानगी असलेली झाडे खरेदी करून तोडून वाहतूक करण्याचा व्यवसाय करतो. माझे टिंबर (लाकुड) व्यवसायाचे लायसन्स आहे. त्याचा लायसन्स क्रमांक 2331400318324361 हा आहे. माझे शिक्षण 9 वी पर्यंत झाले असुन मला मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान आहे.

मी हणमंत काटकर यांचेकडून त्यांचे मालकीची मौजे साकुर्डी ता.कराड जि.सातारा येथील जमीन गट नंबर 133 मधील 100 सागाची झाडांची खरेदी केली त्यासाठी लागणारी वनविभागाची झाडे तोडण्याची परवानगी व लाकूड वाहतुकीची परवानगी चे काम मुळ मालक हणमंत काटकर यांचे वतीने मी करणार असून तसा आमचे मध्ये लेखी करार केला आहे. त्याप्रमाणे मुळ मालक हणमंत काटकर यांचे नावे दिनांक 05/12/2025 रोजी वनक्षेत्रपाल, कराड यांना झाडे तोडण्याची परवानगी मिळणेबाबत अर्ज केला होता त्यावर दिनांक 23/01/2026 रोजी वनक्षेत्रपाल (प्रा.) विभाग, कराड यांचेकडील जा.क्र.ब/मा.वृ.तो/2025-26/63 अन्वये हणमंत काटकर यांचे नावे झाडे तोडण्याची वनविभागाची परवानगी मिळाली होती. त्यानुसार मी दिनांक 23/01/2026 ते दिनांक 27/01/2026 या कालावधीमध्ये सदरची झाडांची तोड केलेली आहे. सदरची झाडे तोडल्यानंतर त्याचा वाहतूक परवाना घेण्यासाठी मी वनविभागाचे संतोष जाधवर यांची भेट घेतली असता त्यांनी वाहतूक परवाना देण्यापूर्वी तोडलेल्या झाडांचा पंचनामा करून



Scanned with CamScanner

मोजमापे घ्यावी लागतील असे सांगून त्यांनी पंचनामा न करता मलाच तोडलेल्या झाडांची मापे घेण्यास सांगितली. त्यांनी सांगितलेवरून मी तोडलेल्या झाडांची मोजमापे घेतली.

त्यानंतर तोडलेल्या सागाच्या झाडांची मोजमापांची यादी तयार करून मी दिनांक 31/01/2026 रोजी वनविभाग ऑफिस, वराडे ता.कराड येथे वनपाल संतोष जाधवर यांची भेट घेतली. त्यावेळी वनपाल संतोष जाधवर यांनी तोडलेल्या झाडांची मोजमापे हे अंदाजे एकूण 19 घनमीटर झाले असून प्रत्येकी घनमीटर 400 रु प्रमाणे 7,600/रु द्यावे लागतील असे सांगितले. तसेच झाडे तोडल्यानंतर लाकूड वाहतूकीच्या परवानासाठी त्यावेळी वेगळे पैसे दयावे लागतील असे म्हणून माझ्याकडे मोजमाप करून पंचनामा करण्यासाठी 7,600/- रु ची लाचेची मागणी केली. त्यावेळी वनपाल संतोष जाधवर हे माझ्याकडे मागणी करत असलेले 7,600/- रुपये ही लाच असल्याची माझी खात्री झाली. परंतु मी वनपाल जाधवर यांना पैसे दिले नाहीत तर ते मला तोडलेल्या झाडांचा वाहतुक परवाना देणार नाहीत त्यामुळे मी त्यांना नाईलाजाने पैसे देण्यास होकार देवुन आलो आहे. परंतु त्यांना लाच रक्कम देण्याची माझी अजिबात इच्छा नाही.

तरी आज दिनांक 02/02/2026 रोजी मी वनपाल जाधवर यांनी सांगितलेप्रमाणे शाहू चौक, कराड जि.सातारा येथे जावुन त्यांची भेट घेवून त्यांनी मागणी केलेल्या लाच रकमेबाबत चर्चा करणार आहे. चर्चेदरम्यान त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास आपले विभागाकडुन त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यास विनंती आहे. माझेत व वनपाल संतोष जाधवर यांचेत कोणताही आर्थिक व्यवहार नसुन पुर्ववैमनस्य नाही. वगैरे मजकुराचा सहीचा तक्रारी अर्ज हजर केला. त्यावर आम्ही व पंचानी सह्या केल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. अन्सार पटवेगार यांचेकडे वनपाल संतोष जाधवर हे लाच मागणी करतात अगर कसे? याबाबतची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविले. त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये एमएम कार्डस कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड वेस्टनातुन बाहेर काढले ते व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले. तक्रारदार व पंच यांना व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती दिली तसेच त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे उपस्थित सर्वांची खात्री करून दिली. त्यानंतर आम्ही उपस्थित पंच साक्षीदार, तक्रारदार व सापळा पथकास पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर 11.51 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार पटवेकार व पंच पंच क्र.1 सुहास डाफळे पंच क्र. 02 आकाश देसाई यांचे पडताळणी कारवाईचे निवेदन घेतले. तक्रारदार व पंचांचे निवेदन घेवुन शाहु चौक, कराड येथे जाणेसाठी तक्रारदार यांना पंच नंबर 1 यांचेसोबत तक्रारदार यांचेकडील दुचाकीवरुन रवाना केले.

त्यानंतर आम्ही सापळा पथक पंच क्र.02 असे जलशुद्धीकरण केंद्र कराड येथे थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 12.46 वा.ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 डाफळे यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे शाहु चौक, कराड येथे गेलो तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल फोन नंबर 7798677765 वरुन लाउड स्पीकर ऑन करून वनपाल,संतोष जाधवर यांचे मोबाईल फोन नंबर 9850520664 वर फोन करून "कुठ आहे साहेब" असे विचारले तेव्हा वनपाल जाधवर यांनी "आता मी निघालोय, तु कुठ हाय आता" असे तक्रारदार यांना विचारले त्यावर तक्रारदार "मी आता बरोबर ह्याच्यापाशी हाय, आपल सिग्नल पाशी आहे" असे म्हणाले तेव्हा जाधवर यांनी "कुठल्या" असे विचारले तेव्हा तक्रारदार "शाहु चौकच्या अलीकडच्या सिग्नल न्हाय व्हय त्यो" असे म्हणाले तेव्हा जाधवर "हां.. मग शाहु चौकच्या इथे येतो का" असे म्हणाले त्यावर तक्रारदार "हा येतो की" असे म्हणाले. त्यानंतर थोडा वेळ वाट पाहुन तक्रारदार यांनी पुन्हा फोन केला असता जाधवर "हां अन्सार"असे म्हणाले तेव्हा तक्रारदार "हां साहेब, थांबलोय शाहु चौकात हाय" असे म्हणाले. त्यानंतर थोड्या वेळाने एका दुचाकीवर खाकी गणवेश परिधान केलेली व्यक्ती आली व तक्रारदार यांचेशी बोलु लागली तेव्हा तक्रारदार त्यांना "मग नमस्कार जाधवर साहेब काय" असे म्हणाले तेव्हा मला ते वनपाल जाधवर असल्याचे समजले. तेव्हा वनपाल जाधवर तक्रारदार यांना "काय म्हणताय अन्सारजी, तंबाखु पुडी आणली का नाय" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "आज आणली, आज आणली" असे म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर हे "सगळ मिळून करायच झग झग करत बसायच नाय" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "आव पण" असे म्हणाले तेव्हा वनपाल जाधवर हे "मी पण लय आभाळ फाटल्यागत बोलत न्हाय ना, आपले जुने संबंध हायत इसरून विसरलाय आणि जे चालय तेच बोललो. मी चौकशी करून इतराकडून हजार रूपये घेतो. हे तर भोगवटा वर्ग 2 हाय चव्हाणच्या नावावर होत का नाय" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "अव जाधवर साहेब, लय पैस होत्यात व्हय व चारशे रूपये" असे म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर "केल की नाय लय होत" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "आता बघा की किती हयुत्याती" असे म्हणाले. त्यावर वनपाल जाधवर "वर कमी कर काय करायचं ते, मला मारीत जावू नको लका" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "आव असं कसं म्हणताय तुम्ही" असे म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर "अ मला मारीत जावू नकोस" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी "किती पैसे झालं आपलं" असे विचारले. तेव्हा वनपाल जाधवर यांनी "करानां चारशे रूपयेने माझा हिशोब केलाय मी" असे तक्रारदार यांना सांगीतले. तेव्हा तक्रारदार यांनी "किती होत्यात त्याच" असे विचारले. तेव्हा जाधवर हे "तु मेंडमला किती दयायचं ती दि चारशे दि नायतर



Scanned with CamScanner

तिनशे दि मला करायचय मी लोकांची जबाबदारी नाय घेणार इथ बिना कारण भुर्दंड हुतो तिकड" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार त्यांना "ती माझ मी बघतो तिकड काय नाय" असे म्हणाले. तेव्हा लोकसेवक जाधवर व तक्रारदार यांनी कामाबाबत चर्चा केली तेव्हा तक्रारदार यांनी "किती हुत्याती ती पैसे म्हटला" असे विचारले असता वनपाल जाधवर यांनी "माझ का?"असे विचारले तेव्हा तक्रारदार हा म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर यांनी त्यांचा मोबाईल फोन बाहेर काढुन मोबाईल मधील कॅल्क्युलेटर वर सात हजार सहाशे रुपये असा आकडा टाईप करुन दाखविला. तेव्हा तक्रारदार त्यांना "सात हजार सहाशे रुपये लय हुत्याती साहेब, मी हेज साडे तिनशे रूपयेन करणार, करा माझ्यासाठी करा." असे म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर हे "काय विनाकारण आ" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "लय पैसे हुतात साहेब" असे म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर हे "भोगवटा वर्ग दोन हाय ओ, भोगवटा वर्ग दोन हायती कस हुईल चार पाच

जणाच्या खात्यावर जमीन हाय, एकाच्याच हाय व्हय. ते फक्त मी घेतो म्हणून झाली. दुसर कुणी सागर कुंभार असताना ती करतच नव्हतं. असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "बरं ती बाकीच प्रकरण कसं कसं करायच म्हणला तुम्ही" असे म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर यांनी "तुझ्याकड देतो मी" असे म्हणुन तक्रारदार यांना पंचांची सही नसलेला पंचनामा, मोजमाप यादी, मालकीदाराचा जबाब असलेली कागदपत्रे तक्रारदार यांचेकडे दिली. तेव्हा तक्रारदार "ती माझ्याकड दया, पंचाच्या सह्या कुंठ घ्यायच्या काय काय" असे म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर हे "पंचाच नाव टाकू नको नाव चिठ्ठीवर लिहून घी, चिठ्ठी दयायची का ह्याला जोडून" असे म्हणाले. त्यानंतर वनपाल जाधवर व तक्रारदार यांचेत वनपाल जाधवर यांनी दिलेल्या कागदपत्रांबाबत चर्चा झाली तेव्हा लोकसेवक जाधवर हे तक्रारदार यांना "नाय चालणार, ऑबजक्शन नको, राजु भाईला फोन नको करायला, परत डॉकी वर्क कशाला पाहिजे, तुम्ही काय लॅपटॉपवर टाकलया ना, पासाच माहिती हाय ना, ती परत झगझग करत बसशील" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी "त्याच किती आता" असे विचारले तेव्हा वनपाल जाधवर यांनी "पासाचे दोन हजार रुपये" असे तक्रारदार यांना सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांचेत व वनपाल जाधवर यांचेत पुन्हा कामाबाबत चर्चा झाली. त्यानंतर तक्रारदार यांनी "बरं तुम्ही कुठ जाणार हाय आता" असे विचारले त्यावर संतोष जाधवर हे "साता-याला" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार कामाबाबत चर्चा करुन "पंधरा मिनीटात लगीच आलु" असे म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर हे "लगीच परत येणार हाय शिक्का घेवुन आता मॅडमला फोन करणार हाय" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "पंधरा, मी इथ ऑफीसला जाणार न्हाय तुम्ही ह्याचा ऑफीसला आपल्या कुठल" असे म्हणाले. तेव्हा लोकसेवक जाधवर "वराडे" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना "मग येणारच हाय की मी तिकड" असे सांगीतले. तेव्हा वनपाल जाधवर हे "येणार हाय का" असे म्हणाले व तक्रारदार यांना "मला फोन कर मग" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे कामाबाबत चर्चा केली तेव्हा तक्रारदार वनपाल जाधवर यांना "तुम्हाला सात हजार द्यायच, माझ्यासाठी सात हजार साहेब घ्या" असे म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर यांनी मान हलवुन होकार देवुन ""हु लगा लोकांना दारु पाजताय हुं म्हणुस्तर" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व वनपाल जाधवर यांचेत जाधवर यांनी दिलेल्या कागदपत्रांबाबत चर्चा झाली. त्यानंतर मी व तक्रारदार असे तक्रारदार यांच्या दुचाकी वाहनावरुन पुन्हा जलशुद्धीकरण केंद्र कराड येथे परत आलो. त्यानंतर तक्रारदार यांना हकीकत विचारली असता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकुन ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

एकंदरीत यातील तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे दिनांक 02/02/2026 रोजी केले पडताळणी कारवाईमध्ये संतोष जाधवर, वनपाल यांनी तक्रारदार अन्सार पटवेगार यांनी हनमंत काटकर यांचेकडुन विकत घेवुन तोडणी केलेल्या सागवान लाकडाचे मोजमाप घेवुन वाहतुकीचा परवाना देण्यासाठी लागणारा पंचनामा करण्यासाठी प्रतिघनमिटर 400/- रुपये प्रमाणे अंदाजे 19 घनमिटरचे एकुण 7600/- रुपये व तोडणी केलेल्या लाकडांचा वाहतुक पास देण्यासाठी 2000/- रुपये अशी एकुण 9600/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती तक्रारदार यांचेकडे 7000/- रुपये लाचेची मागणी पंच नंबर 1 यांचे समक्ष केली आहे. तसेच तक्रारदार यांना लाच रक्कम घेवुन वन विभाग कार्यालय वराडे ता.कराड जि.सातारा येथे बोलाविले असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार अन्सार पटवेगार यांना सापळापुर्व पंचनामा कारवाई सुरू करण्यात येत असल्याबाबत सांगितले. त्यानंतर आमचे सुचनेनुसार तक्रारदार पटवेगार यांना दोन्ही पंचांसमक्ष लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी लाच रक्कम 7,000/- रुपये हजर केले. त्यानंतर पोशि थोरात यांनी नमुद नोटांचे नंबर कागदावर लिहुन काढले.

त्यानंतर तात्काळ सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरवले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना पडताळणी व सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची अंगझडती व लाचेची रक्कम जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण पोहवा ताटे हे त्यांचे मोबाईल फोन मध्ये करणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर त्यांचे मोबाईल फोनमध्ये नवीन सिलबंद मेमरी कार्ड टाकण्यात आले.



Scanned with CamScanner

त्यानंतर आम्ही शासकिय वाहनामध्ये काळया पडदयाच्या सहाय्याने कृत्रीम अंधारात दोन्ही पंचांना व तक्रारदार शिंदे यांना अन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून त्याचे प्रात्यक्षिक पोहवा राजपुरे यांनी करून दाखवले. त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेली लाच रक्कम पोहवा राजपुरे यांना ॲन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिली. तेव्हा पोहवा राजपुरे यांनी कापसाच्या बोळयाने प्रत्येक चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस ॲन्थ्रासीन पावडर लावली व त्यांनतर पोहवा राजपुरे यांनी सदर लाचेची रक्कम रुपये 7000/- तक्रारदार पटवेगार यांचे पॅन्टचे उजव्य खिशात ठेवली. त्यानंतर पोहवा राजपुरे यांना सापळा पथकातुन वगळण्यात आले. त्यानंतर आम्ही पंचांना तक्रारदार व पोलीस पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या प्रमाणे सूचना दिल्या. तसेच तक्रारदार यांना लाच रक्कम स्विकारलेनंतर डावा हात डोक्यावरुन दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर 14.05 वा. डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये प्रथम तक्रारदार अन्सार पटवेगार त्यानंतर पंच क्र.01 श्री. सुहास डाफळे व पंच क्र.02 आकाश देसाई यांचे सापळा निवेदन ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर तक्रारदार लोकसेवक जाधवर कोठे आहेत याची खात्री करण्यासाठी तक्रारदार यांनी त्यांचा मोबाईल फोन नंबर 7798677765 वरुन लोकसेवक संतोष जाधवर यांचे मोबाईल फोन नंबर 9850520664 वर फोन करून "ह.... कुठंय तुम्ही" असे विचारले असता संतोष जाधवर यांनी "हा ऑफीस मधी हाय" असे सांगीतले तेव्हा तक्रारदार यांनी "कुठ?वराडयात हाय. " असे विचारले असता जाधवर यांनी हो म्हणुन सांगीतले. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांनी परीधान केलेल्या शर्टच्या आतील बनियानला लाऊन देऊन संतोष जाधवर, वनपाल यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार व पंच नंबर 1 यांना तक्रारदार यांचे दुचाकी वाहनावरुन रवाना केले. त्यांचेपाठोपाठ आम्ही, पंच नंबर 2, सापळा पथक असे जलशुद्धीकरण केंद्र कराड येथुन शासकिय वाहनातुन रवाना झालो. तक्रारदार हे त्यांचेकडील दुचाकी वाहनाने पंच नंबर 1 यांना घेवुन जलशुद्धीकरण केंद्र कराड येथुन निघुन हायवेने तळबीड मार्गे वनविभाग ऑफिस वराडे ता.कराड जि.सातारा येथे गेले. तक्रारदार हे गेट मधुन आत गेलेनंतर शासकीय वाहन गेटचे बाहेरच लावुन सापळा पथक वनविभाग ऑफिस वराडे येथे कार्यालयाचे आसपास कोणासही संशय येणार नाही अशा रितीने परिसरात थांबून राहीले.

तक्रारदार व पंच क्र. 01 हे वनविभाग ऑफिस वराडे येथे एका कार्यालयात गेले. थोडया वेळाने तक्रारदार यांनी कार्यालयातुन बाहेर येवुन लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजित इशारा केला असता आम्ही सदर कार्यालयासमोर जावुन तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 14.41 वा ची होती. तेव्हा आडोशास थांबुन राहीलेल्या सापळा पथकातील पोशि शिंदे व पोशि थोरात यांनी संतोष जाधवर, वनपाल यांचा अनुक्रमे डावा व उजवा हात पकडला ती वेळ 14.42 वा ची होती. त्यावेळी यापुर्वी दिल्या सुचना दिलेप्रमाणे पोहवा ताटे यांनी व्हिडीओ चित्रीकरण सुरु केले. तेव्हा आम्ही संतोष जाधवर यांना स्वत:ची ओळख सांगुन त्यांचे नाव व पदाबाबत माहीती विचारली असता त्यांनी त्यांचे नाव संतोष अनंतराव जाधवर, वय 44 वर्षे, व्यवसाय नोकरी वनपाल, वनपरिक्षेत्र कार्यालय कराड, राऊंड ऑफिस वराडे ता.कराड जि.सातारा वर्ग 3, रा. प्लॉट नंबर 130 ए, गजानन हौ.सोसायटी, ओगलेवाडी कराड ता.कराड जि.सातारा मुळ रा. रत्नापुर ता.कळंब जि.धाराशिव असे असल्याचे सांगीतले.

त्यांनतर तक्रारदार यांना संतोष जाधवर यांनी लाच रक्कम कुठे ठेवली याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले की, मी संतोष जाधवर यांना "बर थांबा थांबा, बर जावू का मी, सात हजार हायत" असे म्हणुन माझे पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवलेली लाच रक्कम उजव्या हाताने काढुन संतोष जाधवर यांचे पुढे धरली असता त्यांनी डाव्या हाताने लाच रकमेचा स्विकार करून लाच रक्कम दोन्ही हाताने मोजुन घेवुन त्यांचे पॅन्टचे डावे बाजुच्या खिशात ठेवली असल्याचे सांगीतले. त्यानंतर आमचे सुचनेनुसार पंच क्र.02 श्री. देसाई यांनी संतोष जाधवर यांचे खिशातील लाच रक्कम काढुन त्यांचे ताब्यात घेतली. त्यावेळी लाच रकमेच्या नोटांचे नंबर आणि पंच क्र. 02 यांचे जवळील सापळा पुर्व कारवाई दरम्यानचे नोटांचे नंबर लिहुन दिलेल्या कागदावरील नंबर हे एकच आहेत का याबाबत खात्री करण्यास सांगितले. त्याप्रमाणे पंच क्र.02 श्री. देसाई यांनी नोटांचे नंबर त्यांचेकडील कागदावर लिहीलेल्या नंबरशी पडताळुन पाहीले असता ते तंतोतंत जुळुन आले. त्यानंतर वनविभाग ऑफिस वराडे येथे लाईट बंद करुन कृत्रीम अंधारामध्ये संतोष जाधवर यांचेकडुन हस्तगत केलेली लाच रक्कम व त्यांचे दोन्ही हात अल्ट्रा व्हायलेट दिव्याच्या प्रकाशामध्ये दोन्ही पंचासमक्ष तपासणी केली असता संतोष जाधवर यांचे दोन्ही हातास पुढील बाजुस ,बोटांच्या पेऱ्यावर निळसर चकाकी दिसुन आली. तसेच हस्तगत केलेल्या 7000/- रुपये लाच रकमेस अन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. तसेच पंच क्र.02 यांचे हातासही ॲन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर तक्रारदार यांचे हाताची तपासणी केली असता त्याचे उजवे हातास ॲन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर लोकसेवक संतोष जाधवर यांना तक्रारदार यांचे कामाबाबतचे कागदपत्रांबाबत विचारणा केली असता मुळ अर्जदार काटकर यांचा अर्ज व मोजमाप नोंदी असलेली कागदपत्रे त्यानुसार तक्रारदार यांचे कामाची कागदपत्रे वनविभाग ऑफिस वराडे ता.कराड येथुन पंचासमक्ष ताब्यात घेतली. त्यावेळी पोहवा ताटे यांनी त्यांचेकडील मोबाईल फोनमध्ये कागदपत्रे जसीच्या कारवाईचे छायाचित्रण केले आहे.

Scanned with CamScanner

त्यानंतर सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई शासकीय विश्रामगृह कराड येथे जावून करण्याचे सर्वानुमते निश्चित केले. शासकीय विश्रामगृह कराड येथे आम्ही पंच नंबर 1 यांना घडलेल्या हकीकतीविषयी विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, मी व तक्रारदार तक्रारदार यांचे दुचाकी वाहनावरुन वनविभाग ऑफिस वराडे येथे गेलो तेव्हा तेथे संतोष जाधवर हे कार्यालयाचे बाहेर उभे होते. तेव्हा तक्रारदार यांना पाहुन संतोष जाधवर यांनी "त्यांच्या पाठीवर थाप पण गाडी आमच्या अंगावर, लग्नाला चालला का?" असे विचारले तेव्हा तक्रारदार "नाय उंब्रज मधी पण हायती तीन चार झाड येतो की बघून" असे म्हणाले. तेव्हा जाधवर यांनी "किती झाड हायती" असे विचारले त्यावर तक्रारदार यांनी "कुठली" असे विचारले. तेव्हा वनपाल जाधवर यांनी "उंब्रज मधी" असे विचारले त्यावर तक्रारदार यांनी "उंब्रजी मधी सात हायत" असे सांगीतले. त्यावर वनपाल जाधवर हे "सात फक्त" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "मग बघतो की जावून आता बघीतल्या शिवाय, बघून म्हटलं ठरवू." असे म्हणाले. त्यावर वनपाल जाधवर यांनी तक्रारदार यांना "झाल्याका सह्या" असे विचारले त्यावर तक्रारदार "सह्या कुठल्या, तिकडण आलूय इकड डायरेक्ट, जेवला की नाय?" असे म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर "बिगर परवाना कुठ तोडल्याली नायत ना लाकड" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "नाय कुठ काय, एक लाकूड तोडल नाय कुठल विना परवानगीच, या की" असे म्हणाले. तेव्हा जाधवर हे "नको नको" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी "बर थांबा थांबा, बर जावू का मी, सात हजार हायत" असे म्हणुन त्यांचे पॅन्टचे उजव्या बाजुच्या खिशात ठेवलेली 7000/- रुपये लाच रक्कम काढुन जाधवर यांचेसमोर धरली असता जाधवर यांनी डाव्या हाताने लाच रकमेचा स्विकार करुन लाच रक्कम दोन्ही हातांनी मोजुन लाच रक्कम त्यांचे पॅन्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली व जाधवर हे तक्रारदार यांना "बस" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "बास की आता साहेब, काय साहेब" असे म्हणाले. तेव्हा जाधवर "ठिक हाय, ..... ही लय महत्वाच हाय बाबा" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "चालतय येवु का" असे म्हणाले. तेव्हा वनपाल जाधवर "ओके.... ते प्रकरण कुठंय फोटो काढून घेतो" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "कसल" असे म्हणाले त्यावर वनपाल जाधवर हे "प्रकरणाच" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार त्यांना "व्हाटसअप करतो की" असे म्हणाले. त्यावर वनपाल जाधवर यांनी "कुठय प्रकरण" असे तक्रारदार यांना विचारले तेव्हा तक्रारदार यांनी प्रकरण "घरात हाय" असे सांगीतले. त्यावर तक्रारदार हो म्हणाले. त्यानंतर मी व तक्रारदार ऑफिसचे बाहेर आलो. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचे डोक्याचे केसावरुन डावा हात दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने संतोष जाधवर यांना ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना हकीकत विचारता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली.

तरी दिनांक 02/02/2026 रोजी तक्रारदार अन्सार शब्बीर पटवेगार, वय 39 वर्षे, व्यवसाय - लाकुड व्यवसाय, रा. 601, शनिवारपेठ कराड ता.कराड जि.सातारा यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 02/02/2026 रोजी शाहु चौक कराड येथे पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक संतोष अनंतराव जाधवर, वय 44 वर्षे, व्यवसाय नोकरी वनपाल, वनपरिक्षेत्र कार्यालय कराड, राऊंड ऑफिस वराडे ता.कराड जि.सातारा वर्ग 3, रा. प्लॉट नंबर 130 ए, गजानन हौ.सोसायटी, ओगलेवाडी कराड ता.कराड जि.सातारा मुळ रा. रत्नापुर ता.कळंब जि.धाराशिव शाहु चौक, कराड ता.कराड जि.सातारा यांनी तक्रारदार अन्सार पटवेगार यांनी हनमंत काटकर यांचेकडुन विकत घेवुन तोडणी केलेल्या सागवान लाकडाचे मोजमाप घेवुन वाहतुकीचा परवाना देण्यासाठी लागणारा पंचनामा करण्यासाठी प्रतिघनमिटर 400/- रुपये प्रमाणे अंदाजे 19 घनमिटरचे एकुण 7600/- रुपये व तोडणी केलेल्या लाकडांचा वाहतुक पास देण्यासाठी 2000/- रुपये अशी एकुण 9600/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती तक्रारदार यांचेकडे 7000/- रुपये लाचेची मागणी पंच नंबर 1 यांचे समक्ष केली आहे. तसेच 7000/- रुपये लाच रक्कम सापळा कारवाईवेळी वनविभाग ऑफिस वराडे ता.कराड जि.सातारा येथे तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष स्विकारली आहे. म्हणुन त्यांनी बेकायदेशीररित्या अप्रामाणिकपणे आर्थिक फायदा मिळविलेला आहे म्हणुन माझी त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

हा खबरी जबाब दिला.

(signature) 03/02/26

Scanned with CamScanner